नियमित फौजदारी खटला नं.४१५/२०२४
निशाणी- ४४

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ४ चा जबाब.

मी शपथेवर कथन करते की,
माझे नांवः- सुनिता राजेंद्र वाकोडे
वयः- ४२ वर्षे, धंदाः- गृहिणी
राहणार- प्रेमदान हाडको, अहमदनगर

सरतपास शपथेवर अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी वकील श्रीमती सीमा शेख यांचेकडूनः-

१. मी प्रेमदान हाडको येथे राहयला आहे. दि. २०/१२/२०२३ रोजी मला पोलिसांनी पंचनामा करण्याकरिता बोलाविले होते. घटनास्थळ हे उदय ओव्हळ यांचे घरासमोर प्रेमदान हाडको, कोहिनुर मॉलच्या मागच्या बाजुला होते. घटनास्थळ फिर्यादी स्वाती हिने दाखविले. माझ्या समक्ष घटनास्थळ पंचनामा तयार करण्यात आला मी त्यावर वाचुन सही केली. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास नि. ४५ देण्यात येते. माझ्या सोबत दुसरा पंच अजय सुभाष वैराळ हे सुध्दा हजर होते. घटनास्थळाचा नकाशा माझ्या समक्ष काढण्यात आला होता.

सरतपास पूर्ण.

उलट तपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री.एस.एम.गवळी यांचेकडूनः-

२. मी फिर्यादीला ओळखते ती आमच्या शेजारी राहते. हे म्हणणे खरे नाही की, माझे तिच्या घरी नेहमी येणे जाणे असते. मला रात्री भांडणाचा आवाज ऐकु आला. २२ किंवा २३ तारखेला मला भांडणाचा आवाज आला असेल. हे म्हणणे खरे नाही की, मी २० ते २२ मुंबईला होते. हे म्हणणे खरे आहे की, २२ किंवा २३ तारखेला झालेल्या भांडणाच्या दुस-या दिवशी दोन पुरुष पोलीस तेथे आले होते. त्यांची नावे मला सांगता येणार नाहीत. पोलीस आले तेव्हा मी घराच्या बाहेर बसले होते. मी बाहेर बसले होते तेव्हा पोलिसांसोबत फिर्यादी स्वाती होती. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस व स्वाती माझ्याकडे आले तेव्हा त्यांनी मला पंचनाम्यासाठी आलो असे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस मी घराबाहेर एकटी बसले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्या पोलिसांपैकी कोणत्या पोलिसांनी पंचनामा लिहिला होता

हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी मला लिहिलेल्या पंचनाम्यावर सही करायला सांगितली. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस माझ्याकडे आले तेव्हा त्यांनी मला पंचनामा वाचायला दिला त्यानंतर मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीस व स्वातीसोबत प्रत्यक्ष घटनास्थळावर गेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझ्या भावाने केवळ पोलिसांनी तयार केलेल्या पंचनाम्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रत्यक्ष घटनास्थळी गेले नसल्यामुळे मला तेथे पोलीस कधी आले होते हे सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पुर्ण.

फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

समक्ष,

LAXMIKANT SUDAMRAO PADHEN

Digitally signed by LAXMIKANT SUDAMRAO PADHEN
DN: cn=LAXMIKANT SUDAMRAO PADHEN, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6946981, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2026.04.07 15:40:35 +0530

( एल.एस.पाढेण )
मुख्य न्यायदंडाधिकारी
अहमदनगर.

अहमदनगर
दि.०७/०४/२०२६

नियमित फौजदारी खटला नं.४१५/२०२४
निशाणी- ४६

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ५ चा जबाब.**

मी शपथेवर कथन करतो की,
माझे नांवः- अजय सुभाष वैराळ
वयः- ४५ वर्षे, धंदाः- नोकरी
राहणार- सावेडी, अहमदनगर

**सरतपास शपथेवर अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी वकील श्रीमती सीमा शेख यांचेकडूनः-**

१. दि. २०/१२/२०२३ रोजी मी घरी असताना मला दुपारी आवाज आला त्यामुळे मी बाहेर आलो. पोलिसांनी मला घटनास्थळ पंचनामा करण्यासाठी बोलाविले होते. घटनास्थळ हे कोहिनुर मॉलच्या पाठीमागे आहे. पोलिसांनी माझ्या समक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला. त्यानंतर मी त्यावर वाचुन सही केली. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. घटनास्थळ पंचनामा नि. ४५ वर माझी सही आहे.

सरतपास पूर्ण.

**उलट तपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री.एस.एम.गवळी यांचेकडूनः-**

२. सुनिता राजेंद्र वाकोडे माझी सख्खी बहिण आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि. २०/१२/२०२३ रोजी मी नोकरीवर गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, मी दुपारी आराम करीत असताना पोलीस आले. हे म्हणणे खरे आहे की, बाहेर आलेल्या पोलिसांनी पंचनाम्यावर सही घेतली. हे म्हणणे खरे आहे की, बहिणीने आवाज दिल्यावर मी बाहेर येऊन पंचनाम्यावर सही केली. हे म्हणणे खरे आहे की, त्यादिवशी कोण पोलीस आले होते व कोणी पंचनामा लिहिला हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी घटनास्थळावर गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पुर्ण.

फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत
समक्ष,

LAXMIKANT SUDAMRAO PADHEN
Digitally signed by LAXMIKANT SUDAMRAO PADHEN
DN: cn=LAXMIKANT SUDAMRAO PADHEN, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6946981, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2026.04.07 15:40:43 +0530

( एल.एस.पाढेण )
मुख्य न्यायदंडाधिकारी
अहमदनगर.

अहमदनगर
दि.०७/०४/२०२६